N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)

प्रथम खबर अहवाल

(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** भिलवडी

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0079 **Year (वर्ष):** 2026

**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**16/05/2026 07:05

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार
   **Date From (दिंनाक पासून):** 15/05/2026
   **Date To ( दिंनाक पर्यंत):** 15/05/2026
   **Time Period (कालावधी):** पहर 6
   **Time From (वेळेपासून):** 16:05 बजे
   **Time To (वेळेपर्यंत):** 16:24 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिंनाक ):** 16/05/2026 **Time (वेळ):** 06:25 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 006

**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 16/05/2026 06:37 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

दक्षिण, 0.1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** भिलवडी पोलीस ठाणे जवळ, भिलवडी, पलुस

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** योगेश रमेश चव्हाण

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1988

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली,मिरज,सांगली शहर,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | अँन्टी करप्शन ब्युरो, सांगली,मिरज,सांगली शहर,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8108601919

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संतोष गोविंदराव बेंबडे | | | 1. नरगुळ वसती,कवठेमहांकाळ, कवठेमहांकाळ,कवठेमहांकाळ, सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दी जबाब दि. 16.05.2026

मी योगेश रमेश चव्हाण वय - 38 वर्षे, व्यवसाय - नोकरी, पोलीस निरीक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली, मो.न. 8108601919
सरकारतर्फे फिर्यादी होवून देतो फिर्यादी जबाब की, मी पोलीस निरीक्षक या पदावर अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली येथे कार्यरत आहे.
दि.14/05/2026 रोजी दुपारी 15.00 वा.चे सुमारास मी कार्यालयात हजर असताना पोलीस उपअधीक्षक श्रीमती यास्मीन इनामदार यांनी आम्हास त्यांचे कक्षामधून बोलावून घेवून तक्रारदार श्री. ओंकार महेंद्र कांबळे, रा. बुरूंगवाडी, ता. पलूस, जि. सांगली यांची लाच मागणी तक्रारीची थोडक्यात माहिती सांगुन त्यांची श्री बेंबडे पोलीस भिलवडी पोलीस ठाणे यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार असलेचे सांगून त्यांना त्यांची लेखी तक्रार देणेस सांगितले असता त्यांनी ते उदईक दि.15/05/2026 रोजी बेंबडे पोलीस यांना भेटणार असलेने ते त्यांची लेखी तक्रार उदईक रोजी देतो असे सांगितलेने तक्रारदार यांची तक्रारीबाबत पुढील कारवाई उदईक रोजी करणेच्या सुचना दिली होती.
त्यानंतर आम्ही तक्रारदार ओंकार कांबळे यांचेशी संपर्क करुन त्यांची तक्रार ऐकून घेवून त्यांचे तक्रारीबाबत उदईक दि.15/05/2026 रोजी पडताळणी कारवाई करण्याचे निश्चित करून तक्रारदार यांना दि.15/05/2026 रोजी सकाळी 11.00 वा. भिलवडी गावचे अलीकडील भिलवडी स्टेश्न ते ब्राम्हनाळ जाणारे रोडवरील गारपीर दर्गाजवळ हजर राहणेच्या सुचना दिल्या.
त्यानंतर मी दि. 15/05/2026 रोजी मा. उप-प्रादेशीक परीवहन अधिकारी सांगली यांना पत्रव्यवहार करून वर्ग-3 चे दोन कर्मचारी यांची पंच सेवा मिळणेबाबत विंनती करून दोन्ही पंचांचे संपर्क क्रमांक प्राप्त करून त्यांना तात्काळ एसीबी कार्यालयात हजर राहणेच्या सुचना दिल्या.
दि. 15/05/2026 रोजी मी दिले सुचनेप्रमाणे दोन्ही पंच सकाळी 09.30 वा.चे सुमारास एसीबी कार्यालयात आमचे समक्ष हजर झालेत. त्यानंतर मी दोन्ही पंचांना एक लोकसेवक यांचेविरूध्द लाचेच्या मागणीबाबत पडताळणी करुन लाचलुचपतीचा सापळा लावावयाचा आहे, त्याकामी पंच साक्षीदार म्हणून काम करण्यास तयार आहात का, असे विचारता, दोन्ही पंचानी पंच म्हणून काम करण्यास संमती दिली.
त्यानंतर मी, दोन्ही पंच, पोना/प्रितम चौगुले, पोकॉ/सुदर्शन पाटील,सागर नायकुडे असे डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, व्हिडीओ रेकॉर्डर, मेमरी कार्ड, लॅपटॉप, पिंटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, अॅथ्रासिन पावडर, काळे रंगाचे कापड, साबण व इतर आवश्यक साहित्य घेऊन खाजगी मारुती सुझुकी अर्टिगा एमएच-10- डी क्यु 6485 मधून व पोशि/अजित पाटील, पोशि/ चंद्रकात जाधव असे खाजगी वाहन स्वीप्ट एम एच 10 सी एक्स 9096 मधुन कार्यालयातून 09.45 वा.चे सुमारास रवाना होवून शिवशभो चौक, कर्नाळ, वसगडे मार्गे माळवाडी गावचे अलीकडील भिलवडी स्टेशन ते ब्राम्हनाळ जाणारे रोडवरील गारपीर दर्गाजवळ सुरक्षित ठिकाणी 10.35 वा.चे सुमारास दाखल झालो. त्यानंतर मी तक्रारदार ओंकार कांबळे यांना संपर्क करून आमचेकडील वाहनाचे वर्णन सांगून आम्ही थांबलो त्याठिकाणी येणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे 11.05 वाजता तक्रारदार श्री. ओंकार कांबळे हे त्यांचेकडील बजाज पल्सर एम.एच 10 ई.बी 8341 वरून आमचे समक्ष हजर झाले. त्यानंतर मी तक्रारदार श्री. ओंकार कांबळे यांना आमचेकडील वाहनात बसणेच्या सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार हे आमचेकडील वाहनामध्ये बसले.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. ओंकार कांबळे यांची दोन्ही पंचांची व सापळा पथकातील अंमलदार यांची एकमेकात ओळख करुन दिली. त्यानंतर मी सदर कारवाईसाठी श्री. विजय तुकाराम कस्तुरे यांनी पंच नं. 1 म्हणुन व श्री.



Scanned with OKEN Scanner

महेश तानाजी कलकुटगी यांनी पंच नं.2 म्हणुन काम करण्याचे ठरवले.
त्यानंतर तक्रारदार श्री. ओंकार कांबळे यांनी त्यांची लाच मागणीची तक्रार पंचांसमक्ष थोडक्यात कथन केली. त्यामध्ये तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांचेविरूध्द भिलवडी पोलीस ठाणेत दाखल असले गुन्हा रजि नं.50/2026 गुन्हयामध्ये बेंबडे, पोलीस यांनी गंभीर कलम लागले असल्याचे सांगुन अटक करावी लागेल व पोलीस कस्टडी घेवुन तपास करावा लागेल असे सांगीतले. बेंबडे पोलीस यांनी पोलीस कस्टडी न घेता न्यायालयीन कोठडी घेवुन तपासकामी मदत करतो असे म्हणुन तक्रारदार याचंेकडे 10,000/- रुपयांची मागणी केली असलेबाबतची हकीकत सांगितली.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. ओंकार कांबळे यांना ब्युरोच्या कार्यप्रणालीबाबत माहिती देवून त्यांना त्यांचा तक्रारी अर्ज देण्याबाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. ओंकार कांबळे यांनी त्यांचेसोबत आणलेला त्यांचा हस्तलिखीत लाच मागणीचा तक्रारी अर्ज आमचे समक्ष हजर केला.
सदर तक्रारी अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये "मी वरील ठिकाणी माझे कुटुंबासह राहण्यास आहे. आमचे शेजारीच सुवर्णा शशिकात कांबळे त्यांचे कुटुंबासह राहण्यास आहे.
दि.10.04.2026 रोजी मी, माझे वडील महेंद्र ऊर्फ पप्पु धनाजी कांबळे, माझी आई रोहिणी महेंद्र कांबळे, भाऊ रुद्र महेंद्र कांबळे व सुवर्णा शशिकात कांबळे, शशिकात बाबुराव कांबळे, गणेश शशिकात कांबळे, सौरभ संदीप लोंढे, संदिप बबन लोंढे, राणी संदीप लोंढे यांचेत लाथा बुक्यानी मारामारी झाली होती.
सदर मारामारीमध्ये सुवर्णा शशिकात कांबळे, शशिकात बाबुराव कांबळे, सौरभ संदीप लोंढे, संदिप बबन लोंढे, गणेश शशिकात कांबळे हे जखमी झाले होते. त्यांना उपचाराकरीता सिव्हील हॉस्पीटल सांगली येथे भिलवडी प्राथमीक आरोग्य केंद्रातील डॉक्टर यांनी पाठवले होते. तसेच माझे वडील महेंद्र ऊर्फ पप्पु धनाजी कांबळे यांचे डाव्या हाताला मार लागुन दुखापत झाल्यामुळे त्यांना लाईफ केअर हॉस्पीटल तासगांव येथे अॅडमीट केले होते. माझे वडीलांचे डाव्या हाताला फ्रॅक्चर असल्यामुळे ऑपरेशन करुन रॉड घातला आहे.
दि.11.04.2026 रोजी सुवर्णा शशिकात कांबळे यांनी वरील घडले प्रकारा बाबत भिलवडी पोलीस ठाणे येथे मी, माझे वडील महेंद्र ऊर्फ पप्पु धनाजी कांबळे, माझी आई रोहिणी महेंद्र कांबळे, भाऊ रुद्र महेंद्र कांबळे अशांचे विरुद्ध भिलवडी पोलीस ठाणे येथे वर्दी दिल्याने गुरनं 50/2026 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 189 (2), 191 (2),191 (3), 190, 118 (1), 115 (2), 352 प्रमाणे गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हांचा तपास संतोष बेंबडे,पोलीस, भिलवडी पोलीस ठाणे यांचेकडे आहे.
लाईफ केअर हॉस्पीटल तासगांव येथील डॉक्टरानी मारामारीमध्ये माझ्या वडीलांचा डावा हात फॅक्चर झाल्याने त्यांच्या हाताचे ऑपरेशन होवुन हातामध्ये रॉड घातला असले बाबत भिलवडी पोलीस ठाणे येथे कळवल्याने सुवर्णा शशिकात कांबळे, शशिकात बाबुराव कांबळे, गणेश शशिकात कांबळे, सौरभ संदीप लोंढे, संदिप बबन लोंढे, राणी संदीप लोंढे यांचे विरुद्ध भिलवडी पोलीस ठाणे येथे गुरनं 52/2026 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 189 (2), 191 (2),191 (3), 190, 118 (1), 115 (2), 352 प्रमाणे दि.16.04.2026 रोजी गुन्हा दाखल झाला आहे. सदर गुन्हांचा तपास मदने, महीला ,पोलीस, भिलवडी पोलीस ठाणे यांचेकडे आहे.
आमच्या विरुद्ध दाखल असले गुन्हांमध्ये आम्हाला संतोष बेंबडे, पोलीस यांनी तपासकामी हजर राहणे बाबत नोटीस दिली होती. भांडण तंटा करु नये म्हणुन तहसिल कार्यालय पलूस येथे हजर केले होते. तहसिल कार्यालय येथे आमचेकडून भांडणतंटा करु नये म्हणुन चांगले वर्तणुकीचा बॉण्ड लिहुन घेण्यात आला आहे.
दरम्यान मुदतीत शशिकात बाबुराव कांबळे, गणेश शशिकात कांबळे, सौरभ संदीप लोंढे, संदिप बबन लोंढे, यांना फॅक्चर असल्याबाबतचे सिव्हील हॉस्पीटल सांगली यांचेकडून वैद्यकीय सर्टिफिकेट पोलीस स्टेशनला आले होते. त्यांमुळे बेंबडे पोलीस यांनी आमचे विरुद्ध दाखल असले गुन्हास भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 118 (2) हे वाढीव कलम लावले होते.
दि.14.05.2026 रोजी बेंबडे, पोलीस यांनी आम्हाला गुन्हांला गंभीर कलम लागले असल्याचे सांगुन अटक करावी लागेल व पोलीस कस्टडी घेवुन तपास करावा लागेल असे मला सांगीतले व बेंबडे पोलीस यांनी पोलीस कस्टडी न घेता न्यायालयीन कोठडी घेवुन तपासकामी मदत करतो असे म्हणुन माझ्याकडे 10,000/- रुपयांची मागणी केली आहे. मी त्यांना आमची परिस्थिती नसून पैसे देवु शकत नसल्याचे सांगितले. तेंव्हा बेंबडे पोलीस यांनी आम्हाला अटक करुन पोलीस कस्टडी घेण्याची भिती घातली.
आज रोजी मी भिलवडी पोलीस ठाणे येथे जावून संतोष बेंबडे, पोलीस यांची भेट घेवून आमच्या विरुद्ध दाखल गुन्हांमध्ये पोलीस कस्टडी न घेण्याकरीता व तपासकामी मदत करण्या संदर्भात चर्चा करणार आहे. त्यावेळी संतोष बेंबडे, पोलीस हे माझ्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करतील याची मला खात्री आहे. मला संतोष बेंबडे, पोलीस यांना लाच देण्याची इच्छा नाही.



Scanned with OKEN Scanner

माझेत व संतोष बेंबडे, पोलीस यांचेत कोणताही उसनवारीचा व्यवहार अगर आपआपसात कोणताही भांडणतंटा नाही. तरी त्यांचेवर कारवाई व्हावी ही विंनती " अशी हकीकत अर्जामध्ये नमूद आहे.
त्यानंतर मी सदर तक्रारी अर्जावर सही केली. त्यानंतर मी तक्रारदार श्री. ओंकार कांबळे यांचा तक्रारी अर्ज दोन्ही पंचाना वाचण्यास दिला. दोन्ही पंचांनी तक्रारी अर्ज वाचून तक्रारदार यांनी तोंडी सांगीतलेली तक्रार व तक्रारी अर्जामधील मजकूर एकच असल्याचे असल्याची खात्री करून तक्रारी अर्जावर दोन्ही पंचांनी सह्या केल्या.
त्यानंतर तक्रारदार यांचे तक्रारीची पडताळणी करुन लोकसेवक बेंबडे पोलीस भिलवडी यांचेविरूध्द लाचलुचपतीची सापळा कारवाई करण्याचे निश्चित केले.
त्यानंतर मी तक्रारदार व दोन्ही पंचांना कार्यालयाकडील डिजीटल व्हाईस रेकॅार्डर दाखवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली. त्यामध्ये नविन एक मेमरीकार्ड घालून मेमरीकार्ड मध्ये पुर्वीचे संभाषण नसल्याचे खात्री करून दिली.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. ओंंकार कांबळे व पंच क्र.1 विजय कस्तुरे यांना पडताळणी कारवाईकामी योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर मी 12.09 वाजता माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे पडताळणी कारवाई वेळचे निवेदन डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरमध्ये तसेच सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले. त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 यांना दिले सुचनांची उजळणी करून दिली.
त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 12.14 वा सुरु करुन त्यास असले लेसव्दारे तक्रारदार यांचे गळयामध्ये अडकविला. त्यानंतर मी तक्रारदार व पंच नं.1 कस्तुरे यांना भिलवडी पोलीस ठाणे येथे रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. ओंकार कांबळे हे त्यांचेकडील बजाज पल्सर एम एच 10 ई बी 8341 वरून पंच नं. 1 कस्तुरे यांचेसह रवाना झाले.
त्यानंतर काही वेळाने तक्रारदार श्री. ओंकार कांबळे व पंच नं.1 कस्तुरे असे आमचे समक्ष हजर झाले. त्यावेळी मी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून तो मी 13.04 वाजता बंद करून माझे ताबेत घेतला.
त्यानंतर मी, तक्रारदार श्री कांबळे यांना, लोकसेवक बेंबडे पोलीस यांची भेट झाली का? तुमच्यामध्ये व बेंबडे पोलीस यांचे मध्ये काय संभाषण झाले ? असे विचारता, तक्रारदार श्री कांबळे यांनी हकीगत सांगीतली की, "आपण दिले सुचनेप्रमाणे मी व पंच श्री कस्तुरे असे माझेकडील मो.सा वरून रवाना होवून भिलवडी पोलीस ठाणेचे बाहेर जाऊन रोडवर थांबलो. मी माझे मोबाईलवरुन बेंबडे पोलीस यांना फोन करुन माझे वडीलांचा हात दुखत असलेमुळे तासगावला गेले असलेबाबत सांगितले. त्यावर बेंबडे पोलीस यांनी मला आम्ही यापुर्वी भेटलेले हॅाटेलजवळ येणेस सांगितले. त्यानंतर थोडया वेळाने पुन्हा लोकसेवक बेंबडे यांचा मला फोन आला व त्यांनी भिलवडी पोलीस ठाणेजवळील कमानीजवळ मला येणेस सांगितले. मी व पंच कस्तुरे असे भिलवडी पोलीस ठाणेजवळील कमानीजवळ गेलेनंतर तेथे बेंबडे पोलीस भेटले. बेंबडे पोलीस यांनी मला त्यांनी पोलीस ठाणेस नोंद घेतलेबाबत तसेच मला व माझे कुटुंबियाना फोन केला असलेबाबत सांगितले. तसेच "मला कोर्ट..मी म्हणल येत नाही ते फोन पण उचलत नाहीत मी काय करु आता कोर्ट म्हणल नाय सोडत आता त्याला जर कोर्टाला फसवत असशील म्हणला कोर्टाला सोडत नाय म्हणले जामीनच देत नाहीत म्हणले कोर्ट मी तर काय करु सकाळपासुन सांगतोय ये ओंकार ये ओंकार ये म्हणुन" असे म्हणाले.
त्यानंतर बेंबडे पोलीस यांनी मला "कोर्टाच्या पुढ जाता येत नाही र आम्हाला कोर्टाच्या समोर घेणार हाय होय आम्ही कोटपिक्षा मोठ हाय होय, कोर्टाला सांगितल असतय आम्ही घेऊन येतोय म्हणुन तुम्हाला आस पन न्हाय पीसीआर मागतोय.... एमसीआर च मागणार आम्ही.... सरळ बेल तुमच तुम्ही करुन घ्या जाऊ दे तुमची जवळचीच भांडण आहेत कशाला आपण तरी अटक करा चार दिवस पीसीआर घ्या", "कलम एकशे अठरा एक व एकशे अठरा दोन काय असतय ते चारही फॅक्चर आहेत त्यांचे" "कलम वाढवलय की, असे म्हणुन बेंबडे पोलीस यांनी त्यांचेजवळील एक कागद मला दाखविला व मला म्हणाले कि, "बघ हे काय लिहलय हि याच स्टेशन डायरीची ऑनलाईन पिंंरट आहे सरकारी ऑनलाईन, काय लिहलय बघ नीट वाच एकशे अठरा दोन पहिल तीनेश सव्वीस होत ते आता कलम बदलल्यात. बी एन एस झालय आता तीनशे चोवीस पहिल सोडत होती सोडता येतय अटक करायची गरज लागत नाही अटक करता येत नाही शक्यतो पण तीनशे सव्वीसला अटक करावी लागत्या जबर दुखापत आसत्या ती तीनशे चोवीस कशी साधी दुखापत असत्या सिंपल मारामारी असत्या जबर दुखापत म्हणजे फॅक्चर झालय म्हणुन तीनशे सव्वीस कलम वाढवलय मी एकशे अठरा दोन पहिल काय होत त्याच्यात हाय का बघ बर इथ एकशे अठरा हाय का बघ इथ एकशे अठरा दोन हाय का कुठ इथ एकशे अठरा एक हाय, एकशे अठरा दोन दिसतय का कुठ त्याच्यात हाय का न्हाय ना मग काय वाढवल", "आता मला अटकच कराव लागतय सोडता येत न्हाय पहिला मला वाटल येणार न्हाय फॅक्चर झाल डॉक्टर म्हणल फॅक्चर झाल म्हणुन सर्टिफिकेट दिल डॉक्टरन" असे म्हणाले.
त्यानंतर बेंबडे पोलीस यांनी पंचांना थांबणेस सांगून मला थोडे बाजुला घेवुन "केलास का नियोजन....नियोजन



Scanned with OKEN Scanner

केलास तु" असे म्हणुन माझेकडे पाहुन त्यांचे उजवे हाताचा अंगठा तर्जनी बोटावर घासुन मला पैशांबाबत विचारले त्यावर मी त्यांना "दहाच म्हणलेला माझ्याकड... पाचच होते साहेब" असे म्हणालो त्यावर बेंबडे पोलीस यांनी "पाचच आहेत का....उदया पाचतर दे.... मग आज पाच कर ....पाच दे उदया" असे म्हणुन माझे कडे दहा हजार रुपये लाचेची मागणी केली. त्यावर मी त्यांना साहेबांशी बोलणेची विंनती केली असता त्यांनी त्यास नकार देवुन " देवुन टाक म्हणल जावुदे... दोन तीन हजार रुपये दे" असे म्हणाले. त्यानंतर बेंबडे पोलीस यांनी कोर्टातील संतोष नावचे इसमास फोन केला व उदया सकाळी लवकर येतो असे त्यांना सांगितले.
मी बेंबडे पोलीस यांना "उदया पाचच नियोजन होईल...कुठे घेवुन येऊ असे विचारले असता त्यांनी मला "आत्ता पाच आणलास का" असे विचारलेवर मी त्यांना "आणल नाही आता उदया म्हणला ना" असे म्हणालो. त्यावर त्यांनी "आत्ता घेवुन ये लगेच थोडया वेळाने ये की इकडे असे म्हणाले" "तुला यायचं का नाय.. मला सांग.. नाही तर .. मला प्रोसिजर करु दे.. नाय तर मी पी सी आर घेईन बघ.. तुला सांगतो.. मी स्पष्ट शब्दात सांगतो.. मी ऐकणार न्हाय परत.. परत म्हणायचं न्हाय मला..की साहेब आसं न तसं.. मी तुला एवढं नियोजन करतो आणि सांगतो.. समजून तरी.. तु आहेस न्हवं.. असे म्हणाले. मी बेंबडे पोलीस यांना पाचचं नियोजण हाय.. पाच घेऊन येवू का मग.. असे विचारलेवर त्यांनी "पाच घेऊन ये आता.. उद्या.. मिंटल की.. हं..मला तुला त्रास देयचा न्हाय.. मला उगच गंडवू नको.. न्हाय म्हणून सांग सरळ आदीच सांगतोय तुला स्पष्ट न्हाय म्हणुन यायच नसेल तर येऊ नको उदया फोन आल्यानंतर अटक करीन तुला काय करतोस सांग घेऊन ये काय कोणाला बोलु नको दादयाला फिदयाला बोलु नको" असे म्हणुन मला पैसे घेवुन लवकर येणेस सांगितले त्यानंतर मी व पंच कस्तुरे असे भिलवडी पोलीस ठाणेजवळुन रवाना होवून आपणासमक्ष हजर झालो" वगैरे हकीकत तक्रारदार यांनी सांगितली.
त्यानंतर मी पंच नं.1) कस्तुरे यांना पडताळणीची हकीकत विचारली असता पंच नं.1) कस्तुरे यांनी सांगितले कि, "मी व तक्रारदार कांबळे असे तक्रारदार यांचे मो सा वरुन रवाना होवुन भिलवडी पोलीस ठाणेजवळ जाऊन बेंबडे पोलीस यांची भेट घेतली त्यावेळी तक्रारदार व बेंबडे पोलीस यांचेमध्ये तक्रारदार यांचेवरील दाखल असले गुन्हयासंदर्भात चर्चा झाली त्यानंतर काही वेळाने बेंबडे पोलीस यांनी मला बाजुस थांबणेस सांगितले व तक्रारदार यांना बाजुस घेवुन चर्चा करु लागले. त्यांचेतील चर्चा झालेनंतर मी तक्रारदार कांबळे असे तेथुन रवाना होवुन आपणा समक्ष हजर झालो आहे वगैरे मजकुरची हकीकत पंच नं.1) कस्तुरे यांनी सांगितली.
त्यानंतर आम्ही डिजीटल व्हाईस रेकॉर्डर मधील पडताळणीचे वेळी तक्रारदार श्री. ओंकार कांबळे व लोकसेवक बेंबडे पोलीस भिलवडी पोलीस ठाणे यांचे संभाषणातील ध्वनीमुद्रीत झालेली फाईल क्रमांक आरईसी 002 ही ध्वनीमुद्रीत झाली असल्याची व त्यामध्ये वरील प्रमाणे संभाषण झाल्याचे मी, तक्रारदार व दोन्ही पंचानी मुद्देसुद ऐकून खात्री केली.

पडताळणी कारवाईमध्ये, लोकसेवक बेंबडे पोलीस यांनी तक्रारदार यांचेविरूध्द दाखल असले गुन्हयामध्ये बीएनएस कलम 118(2) पुर्वीची भादवि कलम 326 ही कलम वाढ झालेमुळे तक्रारदार व त्यांचे कुटुंबियांना सदर गुन्हयामध्ये अटक करुन न्यायालयात हजर करुन पोलीस कोठडीची मागणी न करता न्यायालयीन कोठडी मागणी करुन सदर गुन्हयामध्ये तक्रारदार यांना मदत करणेसाठी तक्रारदार यांचेकडे आज 5,000/- रूपये व उदया 5,000/- रूपये असे एकुण 10,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती आज 5,000/- रूपये व नंतर दोन तीन हजार रुपये असे एकुण 8,000/- रु लाचेची मागणी केली व तक्रारदार यांना 5,000/- रु लाच रक्कम लागलीच घेवुन येणेस सांगून लाच रक्कम स्वीकारणेची संमती दर्शविली.
त्यानंतर आम्ही लोकसेवक श्री.बेंबडे पोलीस भिलवडी पोलीस ठाणे यांचेविरूध्द सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले. त्यानंतर मी तक्रारदार ओंकार कांबळे यांना लोकसेवक श्री. बेंबडे पोलीस भिलवडी पोलीस ठाणे यांनी मागणी केलेली 5,000/- रूपये हजर करण्यास सांगितले. त्यावेळी तक्रारदार यांनी रक्कमेची जुळणी करून येतो असे म्हणून ते निघून गेले.
त्यानंतर काही वेळाने तक्रारदार हे देखील आमचे समक्ष हजर झाले. व त्यांनी त्यांचेकडे 5,000/- रूपये इतकी रक्कम उपलब्ध झाली असल्याचे सांगून 500/- रूपये दराचे 10 नोटा असे एकुण 5,000/- रूपये आमचे व दोन्ही पंचांसमक्ष हजर केले. त्यानंतर मी सापळा पथकातील अंमलदार यांचेकरवी तक्रारदार यांनी हजर केलेली 5,000/- रूपये रक्कमेच्या नोटांचे नंबर एका को-या कागदावर लिहून घेतले. त्यावर मी, दोन्ही पंच व तक्रारदार यांनी सहया केल्या.
त्यानंतर मी तक्रारदार व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडरचा गुणधर्म, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती देवून त्याचे कार्यपध्दतीबाबत माहिती दिली.
त्यानंतर मी तक्रारदार यांनी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार पोशि/चंद्रकांत जाधव यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन तक्रारदार यांनी हजर केलेल्या 500/- रूपये दराचे प्रत्येक 10 नोटा असे एकुण 5000/- रूपये



Scanned with OKEN Scanner

नोटा तक्रारदार यांचे पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये लोकसेवक बेंबडे पोलीस भिलवडी यांनी मागणी केल्यानंतर त्यांना देणेसाठी ठेवली व आम्ही सापळापुर्व कारवाई पुर्ण केली.
त्यानंतर मी तक्रारदार श्री. ओंकार कांबळे, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. तसेच पथकातील अंमलदार पोशि/चंद्रकांत जाधव यांना भिलवडी स्टेशन ते ब्राम्हनाळ रोडवरील गारपीर दर्गाजवळ थांबणेचे सुचना देवून त्यांना सापळा कारवाईतून वगळण्यात आले. तसेच मी पथकातील अंमलदार पोकॉ/सुदर्शन पाटील यांना त्यांचेकडील हॅन्डीकॅममध्ये लोकसेवक यांचेकडून लाच रक्कम जप्तीबाबत व्हिडीओ चित्रीकरण करणेबाबतच्या सुचना दिल्या.
त्यानंतर मी, तक्रारदार व दोन्ही पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर दाखवून त्यामधील पडताळणी कारवाई वेळचे मेमरीकार्ड काढून माझे ताबेत घेवून त्यामध्ये एक नविन मेमरीकार्ड घातले.
त्यानंतर मी 15.38 वाजता सापळा कारवाईचे माझे, तक्रारदार व दोन्ही पंचांचे निवेदन डिजीटल व्हाईस रेकॉर्डरमध्ये व सोनी हॅन्डीकॅममध्ये रेकॉर्ड केले आहे.
तसेच मी तक्रारदार यांना लोकसेवक श्री. बेंबडे पोलीस भिलवडी पोलीस ठाणे यांनी लाच रक्कम स्विकारलेनंतर हातरूमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा इशारा करणेबाबतच्या सुचना दिल्या.
त्यानंतर मी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.05 वाजता सुरू करून तो मी तक्रारदार श्री. ओंकार कांबळे यांचे गळयामध्ये अकडविला. लोकसेवक बेंबडे पोलीस भिलवडी पोलीस ठाणे यांची भेट घेण्याकरीता रवाना होणेबाबत इशारा केला. त्याप्रमाणे तक्रारदार श्री. ओंकार कांबळे व पंच नं. 1 श्री. विजय कस्तुरे असे तक्रारदार यांचेकडील बजाज पल्सर एम.एच 10 ई.बी 8341 मोटारसायकल वरून रवाना झाले.
त्यांचे पाठोपाठ मी, पंच नं. 2 श्री. कलकुटगी, पोना/प्रितम चौगुले, पोशि/ सुदर्शन पाटील असे लॅपटॉप, पिंरटर, अल्ट्राव्हायलेट दिवा, सिल, काळे रंगाचे कापड व इतर आवश्यक साहित्य घेऊन खाजगी मारुती सुझुकी अर्टिगा वाहन क्र.एम.एच 10 डी.क्यु 6485 मधुन व पोशि/अजित पाटील, पोशि/सागर नायकुडे असे खाजगी वाहन मारुती सुझुकी स्वीप्ट क्र. एमएच-10-सीएक्स-9096 मधून रवाना झालो. पोशि/चंद्रकांत जाधव हे भिलवडी स्टेशन ते ब्राम्हनाळ जाणारे रोडवरील गारपीर दर्गाजवळ येथे सुटकेससह थांबून राहिले.
तक्रारदार यांनी त्यांची मोटारसायकल ब्राम्हनाळ ते भिलवडी स्टेशनचे रोडने भिलवडी गावचे दिशेने घेवून भिलवडी पोलीस ठाणेचे बाहेरील रोडकडेला पार्क केली. लागलीच आम्ही तक्रारदार व पंच नं.1 कस्तुरे हे थांबले ठिकाणापासून काही अंतरावर आमची कार पार्क करून कार मधून उतरून आजुबाजूस सापळा लावून थांबून राहिलो. त्यानंतर तक्रारदार यांनी कोणास तरी फोन केला असल्याचे दिसले. काही वेळाने तक्रारदार व पंच नं.1) कस्तुरे हे पोलीस ठाणे समोरील वाचनालयाचे बाजुस असले रोडवर गेले. सदर ठिकाणी खाजगी वेशातील अनोळखी एक इसम भिलवडी पोलीस ठाणेकडील विंश्रातीगृहामधुन बाहेर चालत येवून तक्रारदार यांचेजवळ आला. व तक्रारदार यांचेशी चर्चा करू लागला. त्यानंतर सदर खाजगी वेशातील अनोळखी इसम याने तक्रारदार यांना भिलवडी पोलीस ठाणेचे समोरील विंश्रातीगृहाचे बाजूस असले मोकळया जागेमध्ये घेवुन जावुन चर्चा करु लागले. त्यानंतर तेथुन सदर अनोळखी इसम हा भिलवडी पोलीस ठाणेकडील विंश्रातीगृहामध्ये निघून जात असताना तक्रारदार यांनी हातरुमालाने तोंड पुसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला.
लागलीच मी व सापळा पथक असे भिलवडी पोलीस ठाणेकडील विंश्रातीगृहामध्ये गेलो. त्यावेळी मी दिले सुचनेप्रमाणे पोशि/अजित पाटील यांनी तक्रारदार यांचेकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर 16.24 वा काढून घेवून बंद करून त्यांचे ताबेत घेतला व तक्रारदार यांना बाजूला जावून थांबण्या बाबत सुचना दिल्या. त्यानंतर आम्ही पंच नं.1) कस्तुरे यांचेसह भिलवडी पोलीस ठाणेकडील विंश्रातीगृहामध्ये आत जावुन गेलेनंतर पंच नं.1) कस्तुरे यांनी सदर विंश्रातीगृहामधील असले एका इसमाकडे हात करून सदर अनोळखी इसम हे लोकसेवक बेंबडे पोलीस असून त्यांनी तक्रारदार यांचेकडून लाच रक्कम स्विकारून त्यांचे पॅन्टचे पाठीमागील डावे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली असलेचे सांगितले.
त्यानंतर मी दिले सुचनेप्रमाणे पोशि/सुदर्शन पाटील यांनी त्यांचेजवळील हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ शुटींग सुरु केले. त्यानंतर मी लोकसेवक श्री. बेंबडे यांना माझी, दोन्ही पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली. त्यानंतर आम्ही दोन्ही पंचांसमक्ष लोकसेवक बेंबडे यांचे निळे रंगाचे पॅन्टचे पाठीमागील डावे बाजुचे खिशाची तपासणी केली असता त्यांचे खिशामध्ये 500/- रूपये दराचे नोटांचे दोन बंडल मिळुन आले. त्यातील एका बंडलमध्ये एकुण 5,000/- रु त्यामध्ये 500/- रु दराच्या 10 नोटा व दुसरे बंडलमध्ये 500/- रु दराच्या 02 नोटा मिळुन आल्या त्यापैकी पहिला बंडल हा लाच रकमेचा असलेचा व दुसरा 02 नोटांचा असलेला बंडल हा त्यांचे वैयक्तीक पैशांचा असलेचे सांगितलेने सदर 02 नोटा बेंबडे पोलीस यांना परत केलेने त्यांनी सदरची रक्कम त्यांचे पॅन्टचे खिशात ठेवली व लाच रकमेचा बंडल पंच नं.2) यांचेकडे तपासणीकरीता दिला. त्यावेळी सदर 5,000/- रु लाच रक्कमेच्या नोटांची



Scanned with OKEN Scanner

पंच नं.2 कलकुटगी यांनी पडताळणी केली असता सदर नोटांचे क्रमांक हे तक्रारदार यांनी सापळा कारवाईवेळी हजर केलेल्या नोटांचे क्रमांकाचेच असलेचे निष्पन्न झाले. सदर लाचेची रक्कम पंच नं 2 श्री. कलकुटगी यांना त्यांचेकडे ठेवण्यास सांगितली त्याप्रमाणे त्यांनी त्यांचेकडे ठेवली. त्यानंतर मी विंश्रातीगृहामध्ये जरूर तो अंधार करून लोकसेवक बेंबडे पोलीस यांची दोन्ही हातांची अल्ट्राव्हायलेट दिव्याचे प्रकाशात दोन्ही हात तपासले असता त्यांचे डावे हातावर निळसर रंगाची अॅन्थ्रॉसिन पावडरची चकाकी दिसुन आली. सदर कार्यवाहीचे पोकॉ/सुदर्शन पाटील यांनी सलग त्यांचेकडील सोनी हॅन्डीकॅममध्ये व्हीडीओ चित्रीकरण केले आहे. त्यानंतर लाचेच्या सापळ्यातील प्राथमिक तपासण्या हया भिलवडी पोलीस ठाणेच्या समोरील असले विंश्रातीगृहामध्ये पुर्ण केल्या आहेत.
त्यानंतर मी लोकसेवक श्री बेंबडे पोलीस भिलवडी पोलीस ठाणे यांना त्यांचे पूर्ण नांव, वय, हुद्दा, पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव श्री. संतोष गोंविदराव बेंबडे वय- 47 वर्षे पोहेकॉ/1601 भिलवडी पोलीस ठाणे रा.नरगुळ वस्ती गुरव शाळेजवळ, घाडगे बिॅल्डिग, रुम नं.6, कवठेमहांकाळ ता.कवठेमहांकाळ जि.सांगली असे असल्याचे सांगितले.

त्यानंतर आम्ही लोकसेवक संतोष बेंबडे यांना ताबेत घेवून भिलवडी पोलीस ठाणे येथे सापळा पथकासह दाखल झालो. त्यावेळी आम्ही लोकसेवक संतोष बेंबडे यांना तक्रारदार यांचेवर दाखल असले गुन्हयाची कागदपत्राबाबत विचारणा केली असता त्यांनी तक्रारदार यांचेवर दाखल असले गुन्हयाचे कागदपत्रे पोलीस ठाणेमधील दप्तरी कक्षामधील एक कपाटामध्ये ठेवलेली असलेचे सांगितले व त्यांनी भिलवडी पोलीस ठाणेमधील दप्तरी कक्षामधील एका कपाटामधुन भिलवडी पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नं.50/2026 भारतीय न्याय संहिता कलम 118(1),118 (2),189(2),190,191(2),191(3),115(2),351,352 या गुन्हयाची कागदपत्रे ताबेत घेतली त्यानंतर आम्ही लोकसेवक संतोष बेंबडे पोहेकॉ/1601 भिलवडी पोलीस ठाणे यांना ताबेत घेवून भिलवडी पोलीस ठाणे येथून 17.30 वा. चे सुमारास रवाना होवून अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथे 18.15 वा.चे सुमारास दाखल झालो.

त्यानंतर मी तक्रारदार कांबळे यांना सापळ्याची सविस्तर हकीकत सांगण्यास सांगितली असता तक्रारदार कांबळे यांनी सापळ्याची हकीकत सांगितली की, "मी व पंच श्री कस्तुरे असे त्यांचेकडील मो.सा वरून भिलवडी पोलीस ठाणेचे बाहेरील रोडवर जाऊन थांबलो. त्यावेळी मी माझे मोबाईलवरुन बेंबडे पोलीस यांना फोन करून त्यांना बाहेर बोलावुन घेतले. त्यानंतर माझेत व लोकसेवक बेंबडे यांचेमध्ये इतर चर्चा झालेनंतर मी बेंबडे पोलीस यांना "तुम्ही सांगितलेल्या पाच हजाराच नियोजन केलय" असे म्हणालो. त्यावर बेंबडे पोलीस यांनी मला" देऊन टाक मला जाऊदे ... उदया जमल तर घेवुन ये दोन तिन हजार जादा आले तर...ह" असे म्हणुन माझेकडे पैशांची मागणी केली त्यावेळी मी माझे उजवे हाताने पॅन्टचे समोरील उजवे बाजुचे खिशामध्ये ठेवलेली 5,000/- रु बाहेर काढुन बेंबडे पोलीस यांचेसमोर धरून ती मोजुन घेणेबाबत सांगितले असता बेंबडे पोलीस यांनी त्यांचे डावे हाताने लाच रक्कम स्विकारुन पॅन्टचे पाठीमागील डाव्या बाजुचे खिशामध्ये ठेवली व मला "उदया ये बर का चुकवु नको, संपला विषय" असे म्हणुन मला व माझे कुटुंबियाना उदया पोलीस ठाणेस येणेस सांगितले व ते निघुन गेले त्यानंतर आमचेतील बोलणे झालेनंतर मी बाजूस येवून हातरुमालाने तोंड पूसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला" वगैरे हकीकत सांगितली.
त्यानंतर मी पंच नं.1) कस्तुरे यांना सापळा कारवाईची हकीकत विचारली असता पंच नं.1) कस्तुरे यांनी सांगितले कि, मी व तक्रारदार असे तक्रारदार यांचे मो सा वरुन रवाना होवुन भिलवडी पोलीस ठाणे जवळ गेलो. त्यावेळी तक्रारदार यांनी बेंबडे पोलीस यांना फोन करुन बाहेर बोलावुन घेतले. तक्रारदार व बेंबडे पोलीस हे चर्चा करु लागले त्यावेळी बेंबडे पोलीस यांनी मला बाजुस थांबणेस सांगितले व ते दोघे माझेपासुन थोडे अंतरावर जावुन चर्चा करु लागले. त्यानंतर तक्रारदार कांबळे यांनी त्यांचे खिशातील लाच रक्कम बाहेर काढुन बेंबडे पोलीस यांचेसमोर धरली असता बेंबडे पोलीस यांनी लाच रक्कम स्वीकारुन त्यांचे पॅन्टचे पाठीमागील डावे बाजुचे खिश्यामध्ये ठेवली असलेचे सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांनी बाजूस येवून हातरुमालाने तोंड पूसून लाच रक्कम स्विकारलेबाबतचा पुर्वनियोजीत इशारा केला" वगैरे हकीकत सांगितली. त्यानंतर पुढील कार्यवाही अॅन्टी करप्शन ब्युरो, कार्यालय सांगली येथे पुर्ण करण्यात आली आहे.

तरी दि. 15/05/2026 रोजीचे पडताळणी कारवाई दरम्यान लोकसेवक श्री. संतोष गोंविदराव बेंबडे, वय - 47 वर्षे, व्यवसाय – पोहेकॉ/1601 भिलवडी पोलीस ठाणे रा.नरगुळ वस्ती गुरव शाळेजवळ, घाडगे बिॅल्डिग, रुम नं.6, कवठेमहांकाळ ता.कवठेमहांकाळ जि.सांगली यांनी भिलवडी पोलीस ठाणेचे समोरील असले भिलवडी पोलीस ठाणेचे समोरील विंश्रातीगृहाचे बाजूस असले मोकळ्या जागेमध्ये, आपले स्वतःचे पदाचा दुरुपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार व त्यांचे नातेवाईक यांचेविरुध्द दाखल असले गुन्हयामध्ये



Scanned with OKEN Scanner

बीएनएस कलम 118(2) पुर्वीची भादवि कलम 326 ही कलम वाढ झालेमुळे तक्रारदार व त्यांचे कुटुंबियाना सदर गुन्हयामध्ये अटक करुन न्यायालयात हजर करुन पोलीस कोठडीची मागणी न करता न्यायालयीन कोठडी मागणी करुन सदर गुन्हयामध्ये तक्रारदार यांना मदत करणेसाठी तक्रारदार यांचेकडे आज 5,000/- रूपये व उदया 5,000/- रुपये असे एकुण 10,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती आज 5,000/- रूपये व नंतर दोन तीन हजार रुपये असे एकुण 8,000/- रु लाचेची मागणी केली व तक्रारदार यांना 5,000/- रु लाच रक्कम लागलीच घेवुन येणेस सांगून लाच रक्कम स्वीकारणेची संमती दर्शविली. त्यानंतर दिनांक 15/05/2026 रोजीचे सापळा कारवाई वेळी लोकसेवक श्री. संतोष गोंविदराव बेंबडे, वय - 47 वर्षे, व्यवसाय – पोहेकॉ/1601 भिलवडी पोलीस ठाणे यांनी भिलवडी पोलीस ठाणेचे विंश्रातीगृहासमोरील रोडचे बाजुस आपले स्वतःचे पदाचा दुरूपयोग करून भ्रष्ट व गैरमार्गाने स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता तक्रारदार यांचेकडून 5,000/- रूपये लाच रक्कम स्विकारून स्वत:चा आर्थिक फायदा मिळविला आहे. म्हणुन माझी लोकसेवक श्री.संतोष गोंविदराव बेंबडे, वय - 47 वर्षे, व्यवसाय – पोहेकॉ/1601 भिलवडी पोलीस ठाणे रा.नरगुळ वस्ती गुरव शाळेजवळ, घाडगे बिॅल्डग, रुम नं.6, कवठेमहांकाळ ता.कवठेमहांकाळ जि.सांगली यांचेविरूध्द भ्रष्टाचार प्रतिंबध कायदा 1988 (सुधारणा 2018) चे कलम 7 प्रमाणे सरकारतर्फे फिंयाद आहे.
माझा वरील फिंयादी जबाब मी सांगितले प्रमाणे संगणकावर टंकलिखीत करण्यात आलेला असून तो पिंंरट काढल्यानंतर मी वाचून पाहिला तो माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष हा दिला वर्दीजबाब,

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):
Bhagwan Jagannath Palve(I (Inspector)) / DGPBJPM8601 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)



Scanned with OKEN Scanner

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Bhagwan Jagannath
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** DGPBJPM8601

ठाणे अंमलदार,
भिलवडी पोलीस ठाणे
जि. सांगली



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोंदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)**



Scanned with OKEN Scanner